**शैक्षणिक वर्ष २०२३-२४**
**अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये विस्तारीकरणांतर्गत नवीन अभ्यासक्रम/ विशेषस्तर विषय/ विषय, अतिरिक्त तुकडी/ विद्याशाखा यांना मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन आदेश क्रमांक :- मान्यता- २०२३/प्र.क्र. १०५/मशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- १५ जून, २०२३.

**संदर्भ** : शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१७/(२०८/१७)/मशि-४, दि. १३.०९.२०१७.

**शासन आदेश**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ आणि संदर्भाधीन दि.१३.०९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार राज्यातील अकृषि विद्यापीठांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी विस्तारीकरणांतर्गत नवीन अभ्यासक्रम / विशेषस्तर विषय/ विषय, अतिरिक्त तुकडी/ विद्याशाखा यांचे प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर केले आहेत. सदर प्रस्तावांची संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या निकषांनुसार छाननी करण्यात आली. विद्यापीठांच्या शिफारशींच्या अनुषंगाने शासन स्तरावर केलेली छाननीनुसार पात्र ठरलेल्या प्रस्तावांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (४) (घ) व त्याखालील परंतुकान्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात सोबतच्या विवरणपत्र-अ मध्ये नमूद केलेल्या एकूण १५ नवीन अभ्यासक्रम/ विशेषस्तर विषय/ विषय, विवरणपत्र-ब मध्ये नमूद केलेल्या एकूण ३ अतिरिक्त तुकडी आणि विवरणपत्र-क मध्ये नमूद केलेल्या एकूण १ विद्याशाखा यांना खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून **कायम विना अनुदान तत्वावर** मंजूरी देण्यात येत आहे.

२. **अटी व शर्ती :-**

१. सोबत जोडलेल्या विवरणपत्रात ज्या अनुदानित महाविद्यालयांना नवीन अभ्यासक्रम/ विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखा मंजूर करण्यात आलेल्या आहेत त्या कायम विनाअनुदान तत्त्वावरील असल्याने सदर मान्यतेच्या अनुषंगाने अशा महाविद्यालयांना अनुदान तत्त्वावर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची मागणी करता येणार नाही.

२. उपरोक्तप्रमाणे ज्या महाविद्यालयाना नवीन अभ्यासक्रम /विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखा मंजूर करण्यात आलेल्या आहेत, त्या महाविद्यालयांनी त्यांच्या विभागीय सहसंचालकांकडे ते भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाहीत असे हमीपत्र रु. १००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टँप पेपरवर सादर करावे.

३. महाविद्यालयाने हमीपत्र सादर केल्याशिवाय किंवा तसे विभागीय सहसंचालकांचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय संबंधित विद्यापीठाने संलग्नतेची प्रक्रिया सुरु करु नये.

४. महाविद्यालयांनी, संबंधित विद्यापीठाने विहित केलेल्या निकषांनुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार अध्यापक / कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असून, इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात व त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी करावी आणि तद्नंतरच उपरोक्त अट क्र. २ मधील प्रमाणपत्र विद्यापीठास द्यावे.

५. महाविद्यालयाने कोणत्याही परिस्थितीत मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत.

६. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (ॲफिलिएशन ऑफ कॉलेजस बाय युनिव्हर्सिटीज) रेग्युलेशन २००९ मध्ये महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्याबाबत विहित निकषांची पूर्तता केल्याशिवाय संबंधित महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्याची कार्यवाही विद्यापीठाने करु नये.

७. संबंधित विद्यापीठांनी, वरील विवरणपत्रातील महाविद्यालयांनी प्रकरणपरत्वे नॅक मुल्यांकन/ पुनर्मुल्यांकन करुन घेण्यासाठी पाठपुरावा करावा.

३. विद्यापीठांनी संलग्नीकरण देण्याबाबत आवश्यक असलेली पुढील कार्यवाही करण्यापूर्वी शासन मान्यता आदेशांचे अवलोकन केल्याशिवाय व विभागीय सहसंचालकाचे अट क्रमांक २ मधील प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय संलग्नता देण्याची प्रक्रिया सुरु करु नये. विद्यापीठांनी संलग्नतेबाबतचा पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना पाठवावा.

४. संबंधित विद्यापीठांनी व विभागीय सहसंचालकांनी मंजूर करण्यात आलेल्या अभ्यासक्रम/ विशेषस्तर विषय/ विषय, अतिरिक्त तुकडी/ विद्याशाखा यांचा नियतकालिक आढावा घेऊन सदर अभ्यासक्रम / विशेषस्तर विषय/ विषय, अतिरिक्त तुकडी/ विद्याशाखा यामध्ये मंजुर विद्यार्थी संख्येच्या ५०% किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी दिसून आल्यास सदर अभ्यासक्रम / विशेषस्तर विषय/ विषय, अतिरिक्त तुकडी/ विद्याशाखा यांची मान्यता रद्द समजून तसे विभागीय सहसंचालकांनी आदेश काढावेत आणि ते शासन व संबंधित विद्यापीठाकडे पाठवावेत. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठ, नागपूर येथे दाखल झालेल्या याचिका क्रमांक २४४६/२०१३ व २४४८/२०१३ मध्ये उपस्थित केलेल्या बाबी विचारात घेता या अटी संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याची जबाबदारी सबंधित विद्यापीठ व विभागीय सहसंचालक यांची राहील.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०६१५१५०६५६१००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: CN = PRATAP PANDURANG LUBAL, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2023.06.19 17:27:42 +05'30'

**( प्रताप पां. लुबाळ )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री (उ.व तं.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव (उ.व तं.शि.वि.), मंत्रालय, मुंबई.
६) आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
९) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
११) संबंधित संस्था,(विद्यापीठामार्फत)
१२) निवड नस्ती (मशि-४).

# विवरणपत्र-अ

**शासन निर्णय क्रमांक:- मान्यता- २०२३/प्र.क्र. १०५/मशि-४, दि.१५ जून, २०२३ सोबतचे सहपत्र.**

## नवीन अभ्यासक्रम/ विशेषस्तर विषय/ विषय

| अ.क्र. | संस्थेचे/महाविद्यालयाचे नाव | प्रस्तावित नवीन अभ्यासक्रम/ विशेषस्तर/विषय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | मुंबई विद्यापीठ, मुंबई | |
| १. | कॉस्मोपोलीटन एज्युकेशन सोसायटीचे वालिया छगनलाल लालजीभाई वाणिज्य महाविद्यालय, वालिया लिलावंतीबेन छगनलाल कला महाविद्यालय डी. एन. नगर, सी. ई. एस. रोड, ता. अंधेरी,<br>जि. मुंबई - सब - अर्बन- ४०० ०५३. | नविन अभ्यासक्रम<br>१) बी . एस्सी.<br>( डाटा सायन्स )<br>(० - ६०) |
| २. | खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, के. एस. पी. महाविद्यालय<br>खोपोली, मु. पो. खोपोली, ता. खालापूर,जि. रायगड - ४१०२०३ | नविन अभ्यासक्रम<br>१) एम . एस्सी.<br>(फिजीक्स ) बाय पेपर |
| | एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई | |
| ३. | स्वोधारक विद्यार्थी संस्था,<br>राणी मा साहेब रावल महिला सायन्स महाविद्यालय, दादासाहेब रावल कॉलेज सिटी मंडळ रोड, दोंडाईचा<br>सिंदखेडा, धुळे जिल्हा : धुळे | **नविन अभ्यासक्रम**<br>एम.एस्सी केमिस्ट्री |
| ४. | **अश्वघोष एज्युकेशन अॅन्ड व्यायाम प्रसारक मंडळ,**<br>वुमेन्स कॉलेज ऑफ बॅचलर ऑफ कम्प्युटर ॲप्लीकेशन राधा कृष्ण मंदिर जवळ, एन-१, सिडको, औरंगाबाद **जिल्हा :** औरंगाबाद | **नविन अभ्यासक्रम**<br>मास्टर ऑफ कॉमर्स |
| ५. | **आदर्श बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ,**<br>डॉ. आर एन लाहोटी महिला सायन्स महाविद्यालय, जालना रोड, सुलतानपूर, लोणार, बुलढाणा **जिल्हा :** बुलढाणा | **नविन अभ्यासक्रम**<br>बी.एस्सी |

| | | |
|---|---|---|
| | **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे** | |
| ६. | विद्या प्रतिष्टाण कॉमर्स व सायन्स कॉलेज पत्ता: विद्यानगरी, इंदापूर, ता इंदापूर, जि पुणे ता.: इंदापूर जि: पुणे पिनकोड: ४१३१०६ | विशेष स्तर<br>वाणिज्य व व्यवस्थापन - बी.कॉम. - बी.कॉम. कॅास्ट अँड वर्क्स अकाउंटिंग वाणिज्य व व्यवस्थापन - बी.कॉम. - बी.कॉम. बँकिंग अँड फाइनान्स<br>विज्ञान व तंत्रज्ञान - बी.एस्सी. - बी.एस्सी. बी.एस्सी. (फिज़िक्स)<br>विज्ञान व तंत्रज्ञान - बी.एस्सी. - बी.एस्सी. बी.एस्सी. (बॉटनी) |
| ७. | इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ कला महाविद्यालय पत्ता: मु-पो-भिगवण ता.: इंदापूर जि: पुणे पिनकोड: ४१३१३० | विशेष स्तर<br>वाणिज्य व व्यवस्थापन - बी.कॉम. - बी.कॉम. बँकिंग अँड फाइनान्स<br>विज्ञान व तंत्रज्ञान - बी.एस्सी. - बी.एस्सी. बी.एस्सी. (केमिस्ट्री) |
| | **कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.** | |
| ८. | स्वोध्दारक विद्यार्थी संस्थेचे दादासाहेब रावल कॉलेज, दोंडाईचा दादासाहेब रावल नॉलेज सिटी, मांडळ रोड, दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे | नवीन अभ्यासक्रम<br>विज्ञान व तंत्रज्ञान<br>१. बी.सी.ए. -प्रथम वर्ष |
| ९. | श्री. शि.वि.प्र. संस्थेचे कै. क.पा.रा. घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे आग्रा रोड, आय.टी.आय कॉलेज समोर, देवपूर, ता. धुळे, जि. धुळे | नवीन अभ्यासक्रम<br>विज्ञान व तंत्रज्ञान<br>१. बी.सी.ए. -प्रथम वर्ष |
| १०. | श्री. शि.वि.प्र. संस्थेचे कै. कर्मवीर डॉ. पा.रा. घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे आग्रा रोड, आय.टी.आय कॉलेज समोर, देवपूर, ता. धुळे, जि. धुळे | नवीन विषय<br>विज्ञान व तंत्रज्ञान<br>१. बी.एस्सी. -डेटा सायंस (विशेष/मुख्य) - प्रथम वर्ष<br>२. एम.एस्सी. -जीवरसायन (विशेष/मुख्य) - प्रथम वर्ष |
| | **शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** | |
| ११. | युवा ग्रामिण विकास संस्था, गारगोटी, जि.कोल्हापूर. श्री आनंदराव आबिटकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कडगांव, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर. | नवीन अभ्यासक्रम -<br>बी.एस्सी. भाग १ - कॉम्प्युटर सायन्स |

| | | |
|---|---|---|
| **१२.** | श्री. वारणा शिक्षण संस्था, ऐतवडे खुर्द, ता.वाळवा, जि.सांगली. वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द, ता.वाळवा, जि.सांगली. | नवीन अभ्यासक्रम - बी.सी.एस. भाग १ (८०) |
| | **संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** | |
| **१३.** | श्रीमती सिंधुताई जाधव कला आणि विज्ञान महाविद्यालय मेहकर, जि. बुलडाणा (३३०) | नवीन अभ्यासपाठयक्रम<br>१. एम.एस्सी. भाग-१<br>(वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित, सुक्ष्मजीवशास्त्र, कॉम्प्युटर सायन्स) |
| | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर** | |
| **१४.** | सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुते | नवीन अभ्यासपाठयक्रम<br>एम.एस्सी. भाग-१ (मायक्रोबायोलॉजी)<br>एम.एस्सी. भाग-१ (संगणकशास्त्र) |
| | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद** | |
| **१५.** | मित्र साधना शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, राजर्षी शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाथ्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद | बी.एस्सी. - संगणकशास्त्र |

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: CN = PRATAP PANDURANG LUBAL, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2023.06.19 17:27:56 +05'30'

**( प्रताप पां. लुबाळ )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

# विवरणपत्र-ब

**शासन निर्णय क्रमांक:- मान्यता- २०२३/प्र.क्र. १०५/मशि-४, दि.१५ जून, २०२३ सोबतचे सहपत्र.**

**अतिरिक्त तुकडी**

| अ.क्र. | संस्थेचे/महाविद्यालयाचे नाव | प्रस्तावित तुकडी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई | |
| १. | **अश्वघोष एज्युकेशन ॲन्ड व्यायाम प्रसारक मंडळ,** वुमेन्स कॉलेज ऑफ बॅचलर ऑफ कम्प्युटर ॲप्लीकेशन राधा कृष्ण मंदिर जवळ, एन-१, सिडको, औरंगाबाद **जिल्हा :** औरंगाबाद | **अतिरिक्त तुकडी** बी.डिझाईन |
| | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | |
| २. | दलित मित्र कदम गुरूजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा | **नवीन अतिरिक्त तुकडी** बी.एस्सी. भाग-१ |
| ३. | दलित मित्र कदम गुरूजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा | **नवीन अतिरिक्त तुकडी** बी.ए. भाग-१ |

PRATAP
PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: CN = PRATAP PANDURANG LUBAL, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2023.06.19 17:28:09 +05'30'

**( प्रताप पां. लुबाळ )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

# विवरणपत्र-क

**शासन निर्णय क्रमांक:- मान्यता- २०२३/प्र.क्र. १०५/मशि-४, दि.१५ जून, २०२३ सोबतचे सहपत्र.**

**विद्याशाखा**

| अ.क्र. | संस्थेचे/महाविद्यालयाचे नाव | प्रस्तावित विद्याशाखा |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | |
| १. | श्री वारणा शिक्षण संस्था, ऐतवडे खुर्द ता.वाळवा जि.सांगली संचलित वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द, ता.वाळवा, जि.सांगली. | नवीन विद्याशाखा – वाणिज्य विद्याशाखा - बी.कॉम. भाग 1 |

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: CN = PRATAP PANDURANG LUBAL, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2023.06.19 17:28:21 +05'30'

(प्रताप पां. लुबाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन